## समाजकार्य : **कार्यकर्ता पुरस्कार : असंघटित कष्टकरी**

धनाजी गुरव



भारतीय समाजव्यवस्थेत जातिव्यवस्था व पितृसत्ताकता यांना वगळून समाजाकडे पाहता येत नाही. या देशातील सामाजिक संरचना अशी आहे की, येथे कोण श्रीमंत होऊ शकतो आणि कोण गरीब होऊ शकतो, हे जातीवरून सहज सांगता येते. जे असंघटित आहेत, ते सर्व ऐतिहासिक दृष्ट्या शूद्रातिशूद्र आहेत. त्यांच्या सामाजिक, आर्थिक अवस्थेबद्दल बोलताना म.जोतिराव फुले म्हणाले होते, 'या देशातील शूद्रातिशूद्र शेटजी, भटजी आणि लाटजी यांनी गांजलेले आहेत.' याचा अर्थ राबणाऱ्या बहुजन समाजाच्या आयुष्यातील दु:खाला या देशातील शेठजी म्हणजे सावकारशाही किंवा भांडवली व्यवस्था, भटजी म्हणजे ब्राह्मणी व्यवस्था आणि लाडजी म्हणजे जुगारवाले, सट्टा, दलाल हे मध्यस्थ यांनी तयार केलेली प्रभावी व्यवस्था कारणीभूत आहे.

# विकासपद्धतीत निर्णायक बदल आवश्यक

आदिवासी, दलित, भटके विमुक्त वेगवेगळे लढताहेत. रोजगार हमीचे कामगार, वनकामगार, बांधकाम मजूर- असे कॉंट्रॅक्ट लेबर वेगळे लढत आहेत. रेशन, पेन्शन, शिक्षण वेगळे लढत आहेत. धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, मच्छीमार, झोपडपट्टी बचाव, निवारा हक्क परिषद स्वतंत्रपणे लढत आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणजे, सरकारवर याचा अपेक्षित परिणाम होत नाही. आपल्या सर्वांचा एकच शत्रू आहे याची जाणीव या सर्व लढणाऱ्यांमध्ये निर्माण होत नाही.

हा पुरस्कार जरी माझ्या नावाने जाहीर झाला असला, तरी तो चळवळीचा आहे. चळवळ हे एकट्या कोणाचे काम नसते, ती एक संघटितपणे होणारी विचार आणि कृतीची अभिव्यक्ती असते. कोणतीही एक व्यक्ती इतरांना वजा करून काहीही करू शकत नाही; चळवळ तर नाहीच नाही. त्यामुळे हा पुरस्कार माझ्यासोबत काम करणाऱ्या सर्वांचा आहे. या कार्यकर्त्यांमध्ये विशेषत: तरुण मुला-मुलींचा भरणा जास्त आहे. त्यामुळे त्या सर्वांचाच या पुरस्कारावर माझ्या इतकाच हक्क आहे, याची मला जाणीव आहे.

या निमित्ताने असंघटितांच्या चळवळी चर्चेला आल्या, हे चांगले झाले. प्रत्येक दिवस त्यांच्यासाठी एक नवे दु:ख घेऊन येतो आहे. याची खरी तीव्रता १९९० नंतर वाढली. मुक्त अर्थव्यवस्थेचे घोडे चौखूर उधळले. सार्वजनिक उद्योगांच्या खासगीकरणाला सुरुवात झाली. नव्या बहुउद्देशीय कंपन्या नव्या क्षेत्रात, नव्या स्वरूपात व्यवसायाला उतरल्या. जुने मालक- मजूर संबंध बदलले. मजुराला आपला मालक सांगता येणार नाही, असे साखळीव्यवसाय चालू झाले. जुने कायदे गैरलागू झाले. नवे कायदे अस्तित्वात नाहीत. जे केले ते सर्व भांडवलदारांना येथील जमीन सहज उपलब्ध व्हावी; पाणी, रस्ते, मजूर सहज उपलब्ध व्हावेत यासाठी. अशा अवस्थेचा वारेमाप फायदा या कंपन्यांनी घेतला. एका बाजूला कोट्यधीशांची संख्या वाढली. पत्नीला लग्नाच्या वाढदिवसाला कोट्यवधींचे विमान, बोट भेट देऊ शकणारे उद्योजक निर्माण झाले, तर दुसऱ्या बाजूला डॉ.अर्जुन सेनगुप्ता कमिशनच्या असंघटित क्षेत्राच्या अहवालाने जगासमोर हे आणले की, या देशातील ८० कोटी लोकांना रोज २० रुपयेसुद्धा मिळत नाहीत. ही विषमतेची प्रचंड दरी या देशात निर्माण झाली. देशाबाहेर, तसेच देशांतर्गत पर्यटनव्यवसाय शेकडो पटींनी वाढला. तसेच पोटासाठी देशोधडीला लागलेले देशभर वाढले. पोट भरण्यासाठी वाढलेल्या या फिरस्त्यांची संख्या इतकी वाढली की, काही लोकांनी 'परप्रांतीय' यांच्या विरोधात स्थानिकांना भडकावून सत्ता मिळवण्याची स्वप्ने पाहायला सुरुवात केली. पोटासाठी फिरणाऱ्या स्त्रियांवरील अत्याचाराची नोंदच नाही, पण एकंदर स्त्रियांवरील अत्याचार भरमसाट वाढले. शेतकऱ्यांच्या आत्महत्या लाखोंच्या आकड्यात गेल्या. नवे एसइझेड व इतर प्रकल्पांमुळे बाधित झालेले शेतकरी, आदिवासी देशोधडीला लागले. त्यांचे काय झाले याचा अभ्यास करणेही सरकारला गरजेचे वाटत नाही. हे सर्व

राज्यकर्त्यांचे नियोजन आहे. हे असे व्हावे यासाठी त्यांनी खास अभ्यास करून नियोजन केलेले आहे. अशा निर्णयांचा परिणाम काय होतो, हे त्यांना माहीत होते. याआधी जगातील अनेक देशांत- विशेषत: आफ्रिकन देशांत झाले, तेच येथे होणार हे अपेक्षितच होते. तरीही आमच्या राज्यकर्त्यांनी तेच धोरण स्वीकारले. हे बहुउद्देशीय कंपन्यांच्या सोईचे तर होतेच. पण ते इंग्रजांच्या काळापासून चालत आलेल्या धोरणांचाच एक भाग होते. ते इंग्लंडमधील जनतेच्या, भांडवलदारांच्या, कारखानदारांच्या गरजेसाठी या देशातील जंगलांचे काय करावे, शेतीत काय पेरावे हे ठरवत होते. त्यांच्या गरजेनुसार कापूस, शाई वगैरे ते पिकवत असत. तसेच सोईचे कायदे त्यांनी बनवले- जंगल, जमीन, खाणी इत्यादी बाबतींत. स्वातंत्र्यानंतर या देशातील राज्यकर्त्यांनी त्यामध्ये विशेष फरक केला नाही. तर याच धोरणाची तीव्रता १९९० नंतर वाढली. आता फक्त इंग्लंडच नव्हे, तर ज्याला शक्य असेल त्या सर्वांनी यावे- असा आग्रह केला जाऊ लागला. या देशातील माती, पाणी, वनस्पती, जंगले, श्रम, मेंदू, जनावरे, घरे जणू काही बहुद्देशीय कंपन्यांच्या वापरासाठी पडून आहेत. त्यांचे दुसरे काहीही होऊ शकत नाही, असेच जणू ठरवण्यात आले. तुमच्या जंगलात झाडे कोणती असावीत यासाठी आतापर्यंत कोणत्या प्रकारच्या वनस्पती होत्या; याऐवजी कोणत्या कंपनीची बियाणी स्वस्त मिळतात व शेतकऱ्यांच्या किंवा जनावरांच्या उपयोगाची कोणती नाहीत तीच झाडे जंगलात वाढायला लागली. एक्झॉटकिविरुद्ध इंडिजीनस हा वैचारिक नव्हे, जैवविविधतेच्या अस्तित्वाचाच संघर्ष चालू झाला. वनस्पतींचे, पिकांचे, जनावरांचे, माशांचे स्थानिक वाण नष्ट झाले. सर्व शेती बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातात गेली. शेतकऱ्यांना अनोळखी पिके, जनावरे, रोगराई अन् त्यावरील औषधे- सर्वच अनोळखी. त्यामुळे १०० टक्के बाजारपेठेवर नियंत्रण. बाजारात गेल्याशिवाय शेतात जाताच येत नाही. बाजारावर सरकार व शेतकरी यांचे नियंत्रण नाही, तर भांडवलदार व व्यापाऱ्यांचे नियंत्रण. बिनपाटांची धरणे, मग एन्रॉनची वीज, जैनांचे पाईप, किर्लोस्करांची मोटर आणि त्यासाठी फायनान्स कंपन्यांची कर्जे. महागडी कीटकनाशके आणि परत न उगवणाऱ्या बियाण्यांच्या शिफारशीसाठी जनतेच्या पैशातून सरकारी शेती खाते. या सर्वांचा परिणाम शेवटी काय होणार? हजारो आत्महत्या.

या विरोधात लढे होत नाहीत असे नाही, पण हे सर्व लढे प्राथमिकपणेच लढले जात आहेत. आदिवासी, दलित, भटके विमुक्त वेगवेगळे लढताहेत. रोजगार हमीचे कामगार, वनकामगार, बांधकाम मजूर- असे कॉंट्रॅक्ट लेबर वेगळे लढत आहेत. रेशन, पेन्शन, शिक्षण वेगळे लढत आहेत. धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, मच्छीमार, झोपडपट्टी बचाव, निवारा हक्क परिषद स्वतंत्रपणे लढत आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणजे, सरकारवर याचा अपेक्षित परिणाम होत नाही. आपल्या सर्वांचा एकच शत्रू आहे याची जाणीव या सर्व लढणाऱ्यांमध्ये निर्माण होत नाही. हे विभागीय हितसंबंधांचे लढे सर्व जनसमूहाला एकत्र आणू शकत नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे जनतेच्या दु:खात भरच पडते आहे.

### कोण आहेत हे असंघटित?

भारतीय समाजव्यवस्थेत जातिव्यवस्था व पितृसत्ताकता यांना वगळून समाजाकडे पाहता येत नाही. या देशातील सामाजिक संरचना अशी आहे की, येथे कोण श्रीमंत होऊ शकतो आणि कोण गरीब होऊ शकतो, हे जातीवरून सहज सांगता येते. जे असंघटित आहेत, ते सर्व ऐतिहासिक दृष्ट्या शूद्रातिशूद्र आहेत. त्यांच्या सामाजिक, आर्थिक अवस्थेबद्दल बोलताना म.जोतिराव फुले म्हणाले होते, 'या देशातील शूद्रातिशूद्र शेटजी, भटजी आणि लाटजी यांनी गांजलेले आहेत.' याचा अर्थ राबणाऱ्या बहुजन समाजाच्या आयुष्यातील दु:खाला या देशातील शेठजी म्हणजे सावकारशाही किंवा भांडवली व्यवस्था, भटजी म्हणजे ब्राह्मणी व्यवस्था आणि लाडजी म्हणजे जुगारवाले, सट्टा, दलाल हे मध्यस्थ यांनी तयार केलेली प्रभावी व्यवस्था कारणीभूत आहे. अशाच प्रकारचे विवेचन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मनमाडच्या परिषदेत केले होते. त्यांनी सांगितले होते की, राबणाऱ्या बहुजन समाजाचे दोन शत्रू आहेत. एक भांडवलशाही आणि दुसरी- ब्राह्मणशाही. जे पूर्वाश्रमीचे शूद्रातिशूद्र आहेत, तेच असंघटित आहेत आणि तेच ही दु:ख भोगताहेत. याचे मुख्य कारण मनुस्मृतीत आहे. मनुस्मृतीने शूद्रातिशूद्रांना उत्पादन साधनांची मालकी नाकारली. जमीन-जुमला, धनसंपत्ती, सोने-नाणे,

जनावरेसुद्धा बाळगण्याचा अधिकार त्यांना नव्हता. सर्व जमीन-संपत्ती उच्चजातीय व सरंजामदार राजे आणि ब्राह्मण यांच्या मालकीची होती. इंग्रजी सत्तेने खासगी मालकीला महत्त्व दिले. त्यामुळे ज्या उच्च जातीय आणि सरंजामदारांकडे जमिनीचा व इतर धनसंपत्तीचा ताबा होता, ती सर्व त्यांच्या खासगी मालकीची झाली. किल्ले, राजवाडे, तळी, हिरे, माणिक-मोती, जंगले यांचा ज्यांच्याकडे ताबा होता, ती त्यांची खाजगी मालकी झाली. ज्या जाती आणि समूह शूद्र म्हणून धनसंपत्तीपासून अलिप्त ठेवले गेले होते; ते कायमचेच गरीब, श्रमिक, सर्वहारा म्हणून जीवन जगू लागले. या खासगी मालकीमुळे आताचा शूद्रातिशूद्र हातावर पोट भरणारा श्रमिक झालेला आहे. त्यामुळे इथल्या राजकर्त्यांना- जे भांडवली व्यवस्थेची, ब्राह्मणी व्यवस्थेची भलावण करतात; त्यांना इथल्या शूद्रातिशूद्रांचा प्रश्न कधीच महत्त्वाचा वाटला नाही. मनुस्मृतीप्रमाणे शूद्रातिशुद्र आणि स्त्रिया ही माणसेच नव्हेत, ती जनावरेच आहेत. त्यांचे जगणे-मरणे हे ब्राह्मणी व्यवस्थेच्या दृष्टीने फारसे महत्त्वाचे नव्हते. त्याच विचारांचे राज्यकर्ते आजही तसेच वागताहेत.

**विकासाची दिशाच निर्णायकरीत्या बदलणे गरजेचे**

इथल्या राजकर्त्यांनी विकासाची दिशा ठरवताना भांडवलाची गुंतवणूक व त्यातून मिळणारा नफा, हेच तत्त्व वापरलं. कोणत्याही प्रक्रियेमध्ये जनतेला सामावून न घेता विकासाच्या नावाखाली मोठमोठे प्रकल्प लादण्याचे काम या राज्यकर्त्यांनी केलेले आहे. त्याचे काय परिणाम झाले, हे आपण आधीच पाहिले आहे. खरं तर विकासाचा विचार करताना काही महत्त्वाच्या मुद्यांचा विचार जास्त गांभीर्याने करणं आवश्यक आहे. उदा- संस्कृती. संस्कृती म्हणजे केवळ नाच-गाणी, चित्रकला अगर इतर परफॉरमिंग आर्ट नव्हेत. जेव्हा आपण मराठवाडा, विदर्भ, खानदेश, माणदेश, कोकण असं म्हणत असतो; त्या वेळेला आपण एका वेगळ्या उत्पादनपद्धतीचा विचार करत असतो. याचा अर्थ त्या परिसरातले पाऊसमान, त्या परिसरातील माती, तिची प्रत, खोली, तिथली वेगळ्या प्रकारची झाडं, वनस्पती, पिके, तिथल्या मातीच्या खोलीसोबत उपलब्ध असणारी उत्पादनाची वेगळी साधने, तिथल्या जनावरांची वेगळी जडणघडण- एकंदरीत जैवविविधता ही संस्कृतीसोबत जोडलेली असते. त्यामुळे संस्कृतीचा विचार करणं याचा अर्थ संपूर्ण नव्या उत्पादनव्यवस्थेचा विचार करणं- या उत्पादन-व्यवस्थेतून आणि साधनांतूनच भाषेची निर्मिती झालेली असते. त्यामुळे भाषा हीसुद्धा संस्कृतीचा एक भाग म्हणून विदर्भाचं वेगळेपण, मराठवाड्याचं वेगळेपण, खानदेशाचं वेगळेपण हे अधोरेखित होतं.

**विकासात जैवविविधतेचे स्थान महत्त्वाचे**

कोकणातील वनस्पती वेगळ्या, तेथील पिके-जनावरे वेगळी. त्यांचे हजारो वर्षांचे पारंपरिक ज्ञान कोकणातील माणसाने संकलित करून आतापर्यंत वापरले आहे. त्याच्या विकासाचा विचार करताना त्याच्या गरजा भागवण्यासाठी या संकलित ज्ञानाचा नव्या तंत्रज्ञानासोबत कसा विकास करता येईल, असा विचार झाला तर तेथील जैवविविधतेच्या आधारे तो स्वतःच्या गरजा भागवण्यास समर्थ होऊ शकतो. त्याच्या आजूबाजूच्या जैवविविधतेतून भागणाऱ्या गरजा व बाहेरील परिवेषातून काही वस्तू आणून भागवाव्या लागणाऱ्या गरजा यांचे वर्गीकरण करता आले पाहिजे. त्याच्या परिसरातील जंगलाच्या निमित्ताने मिळणारी हजारो वर्षांची संचित ऊर्जा, त्याच्या ओळखीची झाडे, जनावरे, पिके यांचा कच्चा माल म्हणून उपयोग करून उद्योगाची नवी साखळी उभा करता आली, तर त्याची निरंतरता राखता येईल. उत्पादकता टिकवून वाढवण्याचा प्रयत्न करता येईल. त्यासाठी त्याला बाहेरील तज्ज्ञ व बाजारपेठेवर कमी अवलंबून राहावे लागेल. हेच वेगळेपण मराठवाड्याला, खानदेशाला लागू होऊ शकते. पण त्यांचा काहीही विचार न करता सर्वत्र एकच नमुना लादला तर तो शेतकरी, शेती, पर्यावरण या सर्वांसाठीच घातक होतो.

धन्यवाद.

**धनाजी गुरव**
Mob.: 9422616531

ओळख
**धनाजी गुरव**

# वंचितांचा व स्त्रियांचा निरपेक्ष कैवारी

## राजा शिरगुप्पे

कॉलेजच्या दिवसांत मी धनाजीविषयी त्याच्या हजेरीतच मित्रांना सांगत होतो की... भूक भागवण्यासाठी कधी कधी तो बचकभर मिर्चीचा खर्डा खातो, तेव्हा त्याच्या रुक्षराकट वाटणाऱ्या चेहऱ्यावर एक प्रचंड अशी नाराजी दाटून आलेली होती. त्याचं सगळं शरीरच वेदनेने पिळवटल्यासारखं झालं, हे मला स्पष्ट जाणवलं. खरं तर माझ्या मध्यमवर्गीय मनाला त्याचं इतकं कौतुक होतं... पण आज कळतंय, माझं कौतुक त्याला त्याच्या गरिबीची मी उडवत असलेली जीवघेणी थट्टा म्हणूनच भिडत असावं. मला आणि माझ्या इतर मित्रांना लाभलेल्या मध्यमवर्गीय आर्थिक पार्श्वभूमीवर आम्ही दारिद्र्याला रसिकतेने पाहत होतो; धनाजी ते प्रत्यक्ष जगत होता. अपरिहार्यपणे भोगत होता. पण गंमत म्हणजे, त्यामुळे तो कडवट झाला नव्हता– नाही. सिनिक तर नाहीच नाही. कारण त्यानं कम्युनिस्ट जाहीरनामा वाचला होता आणि परिस्थिती बदलता येते, या मार्क्सच्या घोषणेवर त्याचा व त्याच्या सोबत असलेल्या आम्हा सर्व मित्रमंडळींचा ठाम विश्वास बसला होता आणि आजही आहे. कारण आम्ही सर्वांनीच वाचलेलं ते आशावादी भविष्य दाखवत कृतीला प्रेरणा देणारं पहिलं पुस्तक असावं.

अर्थात हा जाहीरनामा वाचायला आम्ही प्रवृत्त व्हावं, अशीही एकूण परिस्थिती जुळून आली होती 'दैव'योगानं. '...झालाच पाहिजे'ची भाषिक प्रादेशिकतेची अस्मिता घेऊन सतत आंदोलत असलेला निपाणीचा सीमाभाग. कानडी-मराठीच्या सीमारेषेवर आमच्यासाठी कर्नाटक-महाराष्ट्राच्या भौगोलिक हद्दी संपवणारं देवचंद महाविद्यालय. तिथं राष्ट्र सेवादलाच्या मुशीतून आलेले, समाजवादी शील मिरवणारे प्रा.सुभाष जोशी, दलित पँथरचा झेंडा त्या परिसरात रोवणारे प्रा.अच्युत माने, बिडी कामगारांचे जन्मतः वर्गचरित्र घेऊन आलेले आणि त्यामुळे काँग्रेसबद्दल प्रेम असूनही तिथं होणाऱ्या सर्व परिवर्तनवादी चळवळींत स्वतःला झोकून देणारे महाविद्यालयाचे कर्मचारी मोहन बुडके, साहित्य आणि समाज यांच्या नात्याची ओळख सुरक्षित अंतरावरून करून देणारे प्रा.डॉ.पी.डी.गुमास्ते, जन्मजात दलितत्वामुळे भारतीय समाजाच्या अमानुषतेची भेदक ओळख करून देणारे डॉ.जे.डी.कांबळे, डॉ.एन.डी. जत्राटकर आणि गावकुसाबाहेरून जग कवेत घेण्याची क्षमता मिळवण्यासाठी इंग्रजीचं दूध पाजणारे प्रा.एस.टी.नाईक सर त्या महाविद्यालयात असणं (तशी आणखीही खूप नावे आहेत.)... त्यांच्या प्रभावाखाली आम्ही विद्यार्थी म्हणून एकवटणं, त्या फुरफरत्या वयात काही तरी भव्य-दिव्य म्हणजे एकूण व्यवस्था बदलण्याची स्वप्न पाहत आमचं मैत्र जुळणं... हे सारं अघटित नसलं तरी आजही अद्भुत वाटतंय, हे खरं! या मैत्र जुळण्यातूनच आमचा ग्रुप तयार झाला. बाबा आमटेंच्या 'शृंखला पायी असू दे...' गीताचे आम्ही त्या वयात अगदी पागल होतो. त्यातल्या 'निर्मितीची मुक्त गंगा द्या इथे मातीत वाहू' या ओळीने तर काळजाचा ठाव घेतलेला. त्यामुळेच ग्रुपचं नामकरण सहजच 'निर्मिती ग्रुप' झालं.

मागील शतकाच्या त्या ऐंशीच्या दशकात जगभरच चळवळींचा, क्रांत्यांचा कल्लोळ उठला होता. लॅटिन अमेरिकन देशांतल्या बोहेमियन क्रांत्या, क्युबाची क्रांती, त्यातून उभे राहिलेले फिडेल कास्ट्रो, चे गेव्हारासारख्या जगभरच्या क्रांत्योत्सुक तरुणांचे हीरो, जयप्रकाश नारायणांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेली विद्यार्थी तरुणांची अख्ख्या भारताला हलवणारी चळवळ, स्थानिक चळवळींना लाभलेला ऐसपैस अवकाश... त्यामुळे निपाणीची बिडी कामगार चळवळही भारतभरच्या चळवळखोरांना आकर्षण होऊ लागली. जगभरही नोंद घेतली जाऊ लागली. महाराष्ट्रातले, देशातले आणि जगातले अभ्यासक, कार्यकर्ते निपाणीला येऊ लागले. आमचं जग विस्तारत चाललं. 'एक गाव-एक पाणवठा'पासून लोकविज्ञान यात्रेपर्यंत, देवदासी मुक्ती आंदोलनापासून दलित-सवर्ण संघर्षापर्यंत, खानापूर-

विट्याच्या दुष्काळग्रस्त शेतमजूर-शेतकऱ्यांच्या लढ्यापासून मुंबईच्या गिरणी कामगारांच्या संपापर्यंत... साऱ्यांत आम्ही आमचा सहभाग नोंदवू लागलो. मोर्चात जाऊ लागलो, धरणे धरू लागलो, तुरुंगातही गेलो. या साऱ्यांत आमची एकमेकांतली भावनिक गुंतवणूक तर घट्ट होत गेलीच; पण गरिबांबद्दल, कष्टकऱ्यांबद्दल, वंचितांबद्दल एक अपार भाबडी आत्मीयता वाटायला लागली. कुठल्याही श्रीमंतांची ओळख होण्याआधीच त्यांचा राग वाटायला लागला. एक गोष्ट मात्र आता स्पष्ट जाणवतेय की, मध्यम वर्गातून आलेले आम्ही या साऱ्यांत काही तरी हातचं राखून असायचो. आरपार चळवळीत दिसायचा फक्त धनाजीच. चळवळ आमच्यासाठी 'थ्रिल' होती; धनाजीसाठी मात्र ती जगणं होती. त्यामुळे पथनाट्यात तो जेव्हा भूमिका करायचा, तेव्हा तो अभिनेता नसायचा; क्रांतीसाठी पेटलेला रणवीरच भासायचा. मोर्चात चालायचा तेव्हा सैनिकांसारखा जीवावर उदार झालेला असायचा, कामगार शेतकऱ्यांसमोर भाषण करताना माणसं पेटवणारी मशाल व्हायचा. तेवढ्याच निष्ठने तो आपलं महाविद्यालयीन शिक्षणही करत होता. कारण त्याच्या कष्टकरी घरासाठी ज्ञान मिळवण्याची संधी देणारा तेवढाच दरवाजा व्यवस्थेने किलकिला केला आहे, याचं त्याला परिस्थितीनं दिलेलं एक उपजतच भान असावं. त्यामुळे त्याची भावंडं फारशी शिकली नाहीत, किंबहुना र-ट-फ वाचण्यापुरतीच शाळेत गेली. धनाजी मात्र चळवळींच्या माध्यमातून जगाचं भान येत गेल्यामुळे शिकत राहिला. वकील झाला. आम्ही सगळे नोकरी-व्यवसाय शोधू लागलो, तर त्यानं थेट जीवनदानी कार्यकर्ता होण्याची घोषणा केली. आम्ही दचकलोच. कारण धनाजी काही खास खात्यापित्या घरातून आलेला नव्हता. थोड्याशा शेतीच्या तुकड्यावर कशीबशी गुजराण करणारं कुटुंब. बाबा बेचाळीसच्या सशस्त्र क्रांतीच्या म्हणजे प्रतिसरकार चळवळीतला कार्यकर्ता. भूमिगत असताना धनाजीची नवपरिणीता तरुण आई इंग्रज पोलिसांना चुकवत डोंगरात लपलेल्या आपल्या नवऱ्याला आणि त्याच्या साथीदारांना भाकऱ्या पोचवायला जायची. त्यामुळे तिच्यात खडतरतेला आणि धोक्याला तोंड देण्याची एक वृत्ती कायमची तयार झालेली. अख्ख्या गावाच्या विरोधात जाऊन त्या विद्यार्थी वयात धनाजीनं गावात 'एक गाव-एक पाणवठा' घडवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तिच्याच एकटीच्या पाठिंब्यापुढं गावदेखील हतबल झालं. तिलाही धनाजीचा निर्णय पटला नाही. आता बापापाठोपाठ पोरालाही भिकेचे डोहाळे लागले, म्हणून त्रागा केला. पण गंमत म्हणजे पोलीस झालेल्या धनाजीच्या थोरल्या भावानं विरोधाचा सूर काढताच तीच धनाजीच्या पाठीमागे खंबीरपणे उभी राहिली.

धनाजीच्या या निर्णयामागे त्याची केवढी मोठी मेहनत होती, हे त्या वेळी लक्षात आलं. निपाणीच्या बिडी कामगार संघटनेत पडेल त्या कामाची जबाबदारी तो का आणि कशी उचलत होता... तंबाखूच्या रास्त भावासाठी झालेल्या शेतकऱ्यांच्या त्या सुप्रसिद्ध लढ्याची तयारी करण्यासाठी परिवर्तनवादी विद्यार्थी संघटनेच्या झेंड्याखाली कागल आणि चिकोडी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पोरांना संघटित करण्यासाठी कशी तंगडतोड करत होता... देवदासींच्या परिषदा, मोर्चे यांच्या आयोजनात आकंठ का बुडत होता... वेगवेगळ्या विज्ञान यात्रा, शेतकरी आणि शेती प्रश्नांच्या जाणीव-जागृती यात्रांतून का अखेरपर्यंत चालत होता? प्रा.जोशी सरांनी दाखवलेल्या चळवळी आणि त्यांच्या आकलनासाठी

धनाजी त्याच्या वरवर रुक्ष आणि
राकट वाटणाऱ्या व्यक्तिमत्त्वामुळं,
शिवाय अखंड गांभीर्याचा लेप चेहऱ्यावर
असल्याने प्रेमच काय, लग्नही करेल
असं वाटत नव्हतं आम्हाला.
अखिल वंचितांचा आणि स्त्रियांचा तो एक
निरपेक्ष कैवारी रक्षक आहे, अशीच
आमच्या मनात त्याच्याबद्दलची प्रतिमा होती
आणि आहे. पण त्या काळात तो रुक्ष
वाटणारा धनाजी प्रत्यक्षात किती हळवा आहे,
कविमनाचा आहे, रसिक आहे आणि
आमच्या मुलांच्या शब्दांत 'गमत्या' काका
आहे- हे एकेक पापुद्रा निघावा तसा या संपूर्ण
काळात उलगडत गेला.

डॉ.ध्रुव मांकडने बसवलेल्या वैचारिक शिस्तीतून आमच्यातला तो अव्वल आलेला विद्यार्थी होता. त्या वेळी जगभर गाजत असलेल्या, खानदेशातल्या धुळे-शहादा परिसरात चालू असलेल्या भिल्ल, पावरा या आदिवासी परिसरातील श्रमिक संघटनेने चालवलेल्या मालदार विरोधी संघर्षात त्यानं स्वतःला झोकून दिलं. तब्बल दहा वर्षे काढली त्यानं तिथं. आणि इथं आम्ही सारेच थंडावलो. हळूहळू लक्षात येत गेलं, धनाजीच आमची ऊर्जा आणि गती होता मुळात.

वाढता-वाढता वाढे म्हणजे काय, हे मग धनाजीला विस्तारताना पाहत लक्षात आलं. आम्हाला अप्राप्य वाटणाऱ्या आमच्या वैचारिक दैवतांच्या मांडीला मांडी लावून बसला. त्यांच्यासोबत सभा, परिषदा गाजवू लागला. कॉ.शरद पाटील, भाई एन.डी.पाटील, बाबा आढाव, मेधाताई पाटकर, आ.ह.साळुंखे, कॉ.गोविंद पानसरे, निळू फुले, वाहरू सोनवणे, भाई वैद्य, अनिल सद्गोपाल, भारत पाटणकर, नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड आणि कितिक. महाराष्ट्र आणि देशभरच्या डाव्या कार्यकर्त्या-विचारवंतांच्या मांदियाळीत आमचा धनाजीही ओळखला जाऊ लागला. धरणग्रस्तांपासून दुष्काळग्रस्तांपर्यंत आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपासून सांस्कृतिक समस्यांपर्यंत प्रत्येक क्षेत्रातल्या वंचितांच्या प्रश्नांचा अभ्यासक, विचारवंत आणि कृतिशील लढाऊ कार्यकर्ता म्हणून मुद्रा उठवत राहिला.

धनाजी त्याच्या वरवर रुक्ष आणि राकट वाटणाऱ्या व्यक्तिमत्त्वामुळं, शिवाय अखंड गांभीर्याचा लेप चेहऱ्यावर असल्याने प्रेमच काय, लग्नही करेल असं वाटत नव्हतं आम्हाला. अखिल वंचितांचा आणि स्त्रियांचा तो एक निरपेक्ष कैवारी रक्षक आहे, अशीच आमच्या मनात त्याच्याबद्दलची प्रतिमा होती आणि आहे. पण त्या काळात तो रुक्ष वाटणारा धनाजी प्रत्यक्षात किती हळवा आहे, कविमनाचा आहे, रसिक आहे आणि आमच्या मुलांच्या शब्दांत 'गमत्या' काका आहे- हे एकेक पापुद्रा निघावा तसा या संपूर्ण काळात उलगडत गेला. त्यानं ठरवून आंतरजातीय लग्न करून घेतलं. इंदूताई पाटणकरांनी आईच्या मायेनं त्यासाठी पुढाकार घेतला. विजूनंही ही धनाजीची संतपीडा दागिन्यासारखी स्वीकारली आणि आजतागायत प्रेमाने-कौतुकाने सौभाग्य म्हणून मिरवतेय. तिच्या नोकरीचा निम्मा पगार धनाजीवर, म्हणजे चळवळीवरच खर्च करतेय बिनबोभाट.

या सर्व वाटचालीत मी रस्त्यावरच्या चळवळीत फारसा नाही उरलो, पण धनाजीचं बोट धरून राहिलो. त्याच्यामार्फत जेवढं समाजातलं माझ्यापर्यंत झिरपतं, तेवढ्या भांडवलावर लिहीत राहिलो. लेखक झालो. धनाजी चळवळीत उभा आहे म्हणजे चळवळ आपले शील आणि चारित्र्य सांभाळून आहे... धनाजी आपल्या सोबत आहे, म्हणजे आपल्याला कधीही निराधार व्हावं लागणार नाही- ही त्याच्यासोबतच्या कार्यकर्त्यांची भावना आहे. धनाजी चळवळ सांभाळतोय, आपण धनाजीला सांभाळलं पाहिजे- ही आम्हा मित्रांची भावना आहे.

**राजा शिरगुप्पे**, कोल्हापूर
Mob.: 9423287320